ISBN 978-81-925945-8-3

# सोळाव्या आणि सतराव्या शतकातील संतकवी



डॉ. सौ. वीरा मांडवकर

Subject / Reference Book Published by National Level Publisher

ISBN 978-81-925945-8-3

सोळाव्या आणि सतराव्या शतकातील निवडक संतांच्या व कवींच्या कार्यकर्तृत्वाचा थोडक्यात परिचय करून देणारा संशोधनपर ग्रंथ

# सोळाव्या आणि सतराव्या शतकातील संतकवी

प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र

इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

दूरध्वनी : ०७२०१—२२६१४७, २२६१२९

भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

e mail : marathipradhyapak@gmail.com

(या पुस्तकात संकलन व संशोधन केलेल्या किंवा प्रकाशित मजकुरात काही ठिकाणी तफावत आढळू शकते. पुढील आवृत्तीसाठी अधिकची माहिती, सूचना, बदल, तृटी यांसंदर्भात अभ्यासकांनी कळवावे, ही विनंती.)

मूल्य एकशे साठ रुपये

ISBN 978-81-925945-8-3

⊙ सोळाव्या आणि सतराव्या शतकातील संतकवी
(Solawya Ani Satarawya Shatakatil Santkavi)

⊙ || प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
(Prof. Dr. Mrs. Veera Mandavkar)

⊙ लेखिका — संपर्क : ९४०३०१४८८९

⊙ प्रकाशन क्र. १६

⊙ प्रथमावृत्ती प्रती २००० ⊙ आकार क्राऊन

⊙ मुखपृष्ठ फोर कलर ⊙ पृष्ठसंख्या ११६

⊙ प्रथमावृत्ती दि. १८ मार्च, २०१८ (गुढीपाडवा)

⊙ संगणक/मुखपृष्ठ
डॉ. पवन मांडवकर

⊙ प्रकाशक/मुद्रक/वितरक
डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब,
जि. यवतमाळ ४४५ ४०१
दूरध्वनी : ०७२०१–२२६१४७, २२६१२९
भ्रमणध्वनी : ९४२२८६७६५८
e mail : marathipradhyapak@gmail.com

⊙ सहयोगी वितरक
सेवा प्रकाशन
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६
भ्रमणध्वनी : ९४२२८६७६५८

⊙ मूल्य १६० रुपये

# सोळाव्या आणि सतराव्या शतकातील संतकवी

## प्रस्तावना

तेराव्या शतकाच्या अखेरीस खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात संत चळवळ सुरू झाली. यादवांच्या राजवटीतील चैनविलासात दंग असलेल्या रामदेवरावांचा हा काळ होता. भरभराटीचा काळ संपून तिला ओहोटी लागली होती. शके १२१६ तील अल्लाउद्दीनची स्वारी या अधोगतीला विशेष कारणीभूत झाली. अल्लाउद्दीनची धाड येण्यापूर्वी कर्नाटक, कोंकण इत्यादी बहुतेक सर्व प्रांतांतून मांडलिक राजे बेलगाम होऊन सम्राट सत्ता फक्त नावाला उरली होती.

इस्लामच्या स्वाऱ्या आणि युद्धे यांमुळे येथील उमराव वर्गाची खच्ची झाली. अभिजनवर्गही निष्प्रभ झाला. त्यांच्यापैकी मोठा वर्ग दक्षिणेकडे आश्रयार्थ गेला. खिलजीच्या आक्रमणानंतर तीन शतके म्हणजे शिवाजीचे राज्य येईपर्यंत महाराष्ट्रात इस्लामचे अधिराज्य होते. मुस्लीम राज्यकर्ते आणि त्यांची प्रजा ही परस्परांहून धर्म, संस्कृती, भाषा, कायदा या गोष्टींमध्ये सर्वस्वी भिन्न होती. यादवांचे राज्य